**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - ३०/०१/२०२४

**दि. २९/०१/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९६/२०२४ भा.द.वि.कलम ३०७,३२३, ५०६ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) सह क्रि.लॉ.ॲम. ॲक्ट ३,७ सह महा. पोलीस अधिनियम ३७ (१)(३), १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२९/०१/२०२४ रोजी १२.१५ वा. व १२/४५ वा.चे सुमारास हिरामण बारणे चाळ, पदमजी पेपर मील जवळ थेरगाव,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०१/२०२४ रोजी ००.१८ वा |
| फिर्यादी | :- | आनंद सुभाष जेवुरकर वय २९ वर्ष धंदा- व्यवसाय रा.हिरामण बारणे चाळ,जवळ पदमजी पेपर मील थेरगाव,पुणे |
| आरोपी | :- | आखिल ऊर्फ आदेश सुधीर बाबर इतर दोन अनोळखी व्यक्ती<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांच्या कामावरुन घरी येवुन त्यांचे मित्र विजय शिंदे,आकाश जाधव यांचेसोबत हिरामण बारणे चाळीमध्ये गप्पा मारत असताना १२.४५ वा.चे सुमारास त्यांच्याच चाळीतील फिर्यादी यांचा ओळखीचा इसम आखिल ऊर्फ आदेश सुधीर बाबर व त्याचे दोन अनोळखी साथीदार यांनी स्कुटी क्रमांक एम एच ११ बी वाय ५५६२ यावरुन येवुन फिर्यादीस लाथा बुक्यांनी मारहाण करुन आखिलने त्याचे कंबरेला असलेला कोयता काढुन जीवे ठार मारण्याच्या उददेशाने फिर्यादी यांच्या डोक्यावर वार केला तेव्हा फिर्यादी हे त्याचा जीव वाचवण्यासाठी उजवा हात पुढे केल्याने आरोपीने उजव्या हातावर वार करुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला फिर्यादी यांनी आरडाओरडा केला असता आरोपी यांनी आमच्या आडवे कोणी यायचे नाही आडवे आलात तर मुडदा पाडीन असे म्हणुन हवेत कोयता फिरवुन दहशत निर्माण केल्यामुळे फिर्यादी यांच्या चाळीतील सर्व लोकांनी त्यांचे घराचे दरवाजे बंद करुन घेतले.त्यानंतर आखिल ऊर्फ आदेश सुधीर बाबर व त्याचे इतर दोन अनोळखी साथीदार तेथुन पळुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि माने ८१०८८८८३५२ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ७३/२०२४ भा द वी २७९,३३७, ३३८,४२७,मो वा का. कलम १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २९/०१/२०२४ रोजी दुपारी ०२/०० वाजता सुमारास चाकण शिक्रापूर रोडने शिक्रापूर बाजूकडे चाकण क्रिटी केअर हॉस्पिटल समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि. २९/०१/२०२४ रोजी १८/५४ वा |
| फिर्यादी | :- | लक्ष्मण रावसाहेब मुंगसे वय ५३ वर्षे धंदा शेती राहणार असे तालुका खेड जिल्हा पुणे |
| आरोपी | :- | परमेश्वर भीमराव कांबळे राह. बावी बीड |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी वरील मोटरसायकल नंबर एम एच १४ जी सी ३५४२ हिचे वरून चाकण शिक्रापूर रोडने शिक्रापूर बाजूकडे जात असताना चाकण क्रिटी केअर हॉस्पिटल समोर फिर्यादी यांचे पाठीमागून येणारा ट्रक गाडी नंबर एम एच १४बीजे ३४९१ यावरील चालक आरोपी याने त्याची ताब्यातील वरील ट्रक भरधाव वेगात हायगाईने रस्त्याचे परिस्थितीचे कडे दुर्लक्ष करून मी चालवतअसलेली मोटरसायकल हीस डावे बाजूस धक्का देऊन अपघात करून फिर्यादी व त्यांचे चुलत अंकुश विठ्ठल मुंगसे यांना किरकोळ व गंभीर दुखापत करून मोटरसायकलचे नुकसान करण्यास कारणीभूत झाला आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा धोजे ९१३०९०८५८४ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड २३/२०२४. भा.द.विकलम ४२०,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- सप्टेंबर २०२१ ते आज पावेतो एम्पायरइस्टेट, ई-बिल्डिंग, शॉप नं ०१ व शॉप नं ०२, चिंचवड,पुणे

गुन्हा दाखल :- दि.२९/०१/२०२४ रोजी१७/१३ वा.

फिर्यादी :- योगेश सुरेश सेठिया वय.५० वर्ष व्य.व्यापार रा.संदेश बंगला, जीवननगर, रामकृष्ण मोरे सभागृहाजवळ, चिंचवडगाव, पुणे

आरोपी :- १)मे.ग्रीन फयुअल अल्टरनेटीव्ह प्रा.लि, पत्ता :१२/११ तेजश्री पार्क, को-ऑप हौसिंग सोसायटी म्हाजे पुलाजवळ एरंडवण, पुणे ४११००४ तसेच १/१३१ श्रीनिलायम स्टेशन रोड, गुटी आंध्रप्रदेश ५१५४०.
२)व्यंकटेश तेजा
३)श्रेयल ठाकरे

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना समजपत्राद्वारे सुचित करुन पोलीस ठाणे चिंचवड येथे बोलावुन त्यांचा सविस्तर जबाब नोंदविला असता त्यांनी सांगितले की, मे.ग्रीन फयुअल अल्टरनेटीव्ह प्रा.लि व कंपनीचे संचालक आरोपी २ व ३ यांनी हाय स्पीड इलेक्ट्रिक दोन चाकी व तीन चाकी वाहने ही लो स्पीड वाहने असल्याची व सदर वाहनांना आरटीओ रेजिस्ट्रेशनची आवश्यकता नसल्याचे खोटे सांगुन
फिर्यादी यांना सदर वाहनांची डिलरशीप घेण्यास भाग पाडले तसेच सदर लो स्पीड वाहने ही हाय स्पीडची वाहने असल्याचे लक्षात आलेनंतर त्यांना वारंवार ती वाहने परत घेणेबाबत व सदर व्यवसायाकरिता झालेला खर्च परत देणेबाबत विनंती करुनही त्यांनी आज पावेतो सदर नियम बाहय वाहने परत न घेता फिर्यादी यांची फसवणुक करणेचे उद्देशाने फिर्यादी यांचे आर्थिक नुकसान केले आहे. करिता मे.ग्रीन फयुअल अल्टरनेटीव्ह प्रा.लि व कंपनीचे संचालक आरोपी २ व ३ यांनी फिर्यादी यांची एकुण २९,६९,२२४/- रु ची फसवणुक केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि झिंजुर्डे ९४२०६१७६६०

०४

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ९४/२०२४ भा.द.वि.कलम- ४२०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/०१/२०२४ रोजी सायं. ०६.४३ वा.सुमारास ए-२००३, ७ प्लुमेरीया ड्राईव्ह, ताथवडे पुणे येथे फिर्यादी त्यांच्या घरी असताना

गुन्हा दाखल :- दि.२९/०१/२०२४ रोजी १८.२९ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- 1)Account No. 50100684692332, व
UPI ID:- zoyakhan840983@okhdfcbank धारक अज्ञात इसम
२)खाते क्र. 50100684692332 या बँक खात्यावरुन पुढे पैसे पाठवलेले अज्ञात बँक खातेधारक व तपासात निष्पन्न होणारे इतर अज्ञात इसम
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील HDFC Bank Account No. :- 50100684692332, UPI ID :- zoyakhan840983@okhdfcbank धारक अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या नकळत त्यांच्या एच.डी.एफ.सी. बँक वाकड शाखा अकाऊंट नं. ५०१०००१९६७४०८३ व अकाऊंट नं. ५०१००४५६८०८०६२ मधुन तीन ट्रान्झेक्शन द्वारे एकुण १,९२,१००/- रुपये आरोपीने स्वतःच्या खात्यावर ट्रान्सफर करुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सुर्यवंशी ७२७६६४५९८७

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- शिरगाव परंदवडी २१/२०२४ महा.दारुबंदी अधि.कलम ६५(क)(फ) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २९/०१/२०२४ रोजी १३/४५ वाचे सुमारास शिरगावचे हद्दीमध्ये कंजारभट वस्तीजवळ, पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवे लगत मोकळया जागेत,

गुन्हा दाखल :- दि.२९/०१/२०२४ रोजी १६.१६ वा

फिर्यादी :- ज्ञानेर्श्वर भारत कु-हाडे पो.हवा.ब.नं १४५७ नेम.खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड

आरोपी :- महीला आरोपी

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील महिला आरोपी हीने अंदाजे किं.६,००,०००/- रु चे ६००० लिटर गावठी दारु तयार करण्यासाठी लागणारे गुळ मिश्रीत रसायन भिजत घातले असतांना मिळुन आले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा घाडगे ९९२३१२४३१२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ६३/२०२४ भा.द.वि.कलम ३५४, ३५४ ड

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२८/०१/२०२४ रोजी २१:३० वा सुमारास फिर्यादी यांचे घरासमोर, वास्तुउद्योग अजमेरा कॉलनी, पिंपरी पुणे.

गुन्हा दाखल :- दि.२९/०१/२०२४ रोजी ०२/५३ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अक्षय हुलावळ, वय अंदाजे २० वर्षे, रा. टेल्कोग्राउंड अजमेरा पिंपरी, पुणे **आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी किराणा दुकानातुन घरगुती सामान घेवुन घरी येत असताना फिर्यादीचे ओळखीचा इसम नमुद आरोपी याने फिर्यादीचा पाठलाग करुन फिर्यादी त्यांचे घरासमोर आले असता आरोपीने फिर्यादीचा हात पकडुन फिर्यादीची इच्छा नसताना फिर्यादीशी लगट करण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीने आरोपीस विरोध केला असता आरोपीने “तु छपरी आहेत,फालतु आहेस”असे बोलुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि देशमुख मोनं ९८५०९७६६४२

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ४७/२०२४ भादवि कलम ३६३,३५४, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२८/०१/२०२४ रोजी रात्रौ.२१/०५ वा. चे सुमा. स्टेशन चौक तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.२९/०१/२०२४ रोजी १७/३४ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १) नवनाथ व्यंकटराव ढगे वय २८ वर्ष रा. मोईगाव गट क्रमांक ४६९ चिखली निघोजे रोड पुणे ,
२) मुजा गणपती लुट्टे वय ३० वर्षे रा. निसर्ग हौसिंग सोसा. रुपीनगर निगडी पुणे **आरोपी अटक आहेत**

तपशिल :- नमुद ता .वेळ व ठिकाणी फिर्यादी प्रवास करत असताना आरोपी १ यांची व फिर्यादी यांची बाचाबाची झाली असता आरोपी १ हे फिर्यादी यांचे मोबाईल मध्ये व्हीडीओ शुटींग करत असताना फिर्यादी यांनी माझी व्हीडीओ शुटींग का काढतो या कारणावरुन आरोपी यांचे अंगावर धावुन जावुन आरोपी यांचे हातातील मोबाईल काढुन घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपी १ यांनी फिर्यादी यांचा हात धरुन जवळ ओढले व फिर्यादी यांचे छातीस हात लावुन फिर्यादी यांचे मनास लज्जा निर्माण केली.तसेच गाडीतील सर्व प्रवाशी यांना जागेवर सोडुन फिर्यादी यांना आरोपी १ व २ यांनी फिर्यादी यांना गाडीत जबरदस्तीने बसवुन घेवुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि कोकाटे